# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग

## परिपत्रक

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/९९९.

मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नित, स्वायत्त, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक आणि विद्यापीठाच्या उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १३१(१) अन्वये विद्यापीठाच्या अधिसभेवरील पदवीधर मतदार संघातून दहा (१०) नोंदणीकृत पदवीधरांची नव्याने निवड करण्यासाठी नविन मतदार यादी तयार करण्याकरिता जाहीर प्रकटन क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/८०० दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ प्रसिध्द करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ज्या पदवीधर मतदारांना मतदार नोंदणी करताना संगणक व इंटरनेट सेवा इत्यादींची उपलब्धता होत नसेल अशा इच्छुक मतदार नोंदणीकरीता अर्ज करणाऱ्या मतदारास आपल्या महाविद्यालया मार्फत/विद्यापीठाच्या उपकेंद्रा मार्फत संगणक व इंटरनेट सेवा कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करून देण्यात यावी. जेणेकरून मतदारास मतदार यादीत आपले नाव नोंदविणे सोईचे होईल.

सर्व संबंधीतांनी याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.

**प्रत :-** मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित, स्वायत्त, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक आणि विद्यापीठाच्या उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना योग्य ती कार्यवाही करीता.